# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 12-09-2023**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये हिंगणा ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2023-09-12 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2023-09-13 | 2023-09-14 | 2023-09-15 | 2023-09-16 | 2023-09-17 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 12.4 | 14.6 | 16.3 | 25.6 | 13.4 |
| कमाल तापमान (अं.से) | 31.6 | 31.0 | 29.4 | 29.0 | 28.7 |
| किमान तापमान (अं.से) | 23.1 | 22.9 | 22.3 | 22.4 | 22.6 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 94 | 90 | 95 | 96 | 92 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 71 | 68 | 75 | 72 | 73 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 5 | 4 | 5 | 6 | 5 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 277 | 283 | 296 | 283 | 74 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 6 | 6 | 7 | 7 | 6 |

### हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुका स्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक१३ ते १७ सप्टेंबर २०२३ दरम्यान आकाश आंशिक ते मुख्यतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक १३ ते १७ सप्टेंबर २०२३ दरम्यान हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यतावर्तविण्यात आली आहे. • दिनांक १४, १५, १६ व १७ सप्टेंबर २०२३ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक १७ ते २३ सप्टेंबर २०२३ दरम्यान च्या आठवड्यामध्ये पाऊस हा सरासरी एवढा राहण्याची शक्यता, कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### कृषि सल्ला:

• मध्यम श्रेणीचा पावसाचा अंदाज लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी),कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामे तसेच उभ्या पिकात खते देण्याची कामे पुढील १ ते २ दिवसामध्ये उरकून घ्यावी तसेच त्यानंतर पावसाची उघडीप होईपर्यंत पुढे ढकलावी. • मागील आठवड्यामध्ये झालेल्या पावसामुळे पिक क्षेत्रामध्ये पाणी साचले असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा तसेच पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता पिक क्षेत्रामध्ये पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. • विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतरधातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • स्थानिक हवामान अंदाज व सूचना यांचा अंदाज घेऊनच शेती कामाचे नियोजन करावे. पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता, शेतकरी व शेतमजूर यांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा.शेतातील कामे शक्यतो सकाळच्या वेळी उरकून घेण्याला प्राधान्य द्यावे.शेतमजुरांना शेतामध्ये एकत्रित समूहाने काम करू न देता दोन व्यक्तीमध्ये जास्तीत जास्त अंतर ठेवावे.शेतात आसरा घेताना पाण्याचे स्त्रोत (विहीर, तलाव, नदी इत्यादी), उंच ठिकाणे (झाडे, उंचवटे), धातूचे अवजारे या पासून जास्तीत जास्त अंतरावर आसरा घ्यावा.उंच ठिकाणांवर वीज आकर्षित होत असल्याने कोणत्याही परिस्थितीमध्ये झाडाखाली आसरा घेणे टाळावे. • शेतकरी बांधवांनी कीड आणि रोगाचा प्रादुर्भाव जाणण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे तसेच शिफारशीनुसार पिक वाढीच्या सुरुवातीच्या अवस्थेमध्ये नियंत्रणाच्या उपाययोजनाचा अवलंब करावा.

**संक्षिप्त संदेश सल्ला:**

| |
|---|
| • आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी),कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामे तसेच उभ्या पिकात खते देण्याची कामे पुढील १ ते २ दिवसामध्ये उरकून घ्यावी तसेच त्यानंतर पावसाची उघडीप ह |

**पिक निहाय सल्ला:**

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| मुग | • परिपक्व अवस्थेतील मुग पिकाची काढणी करून घ्यावी व आवश्यकता असल्यास शेड मध्ये सुकू द्यावे व स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन मळणी करून घ्यावी. |
| उडीद | • परिपक्व अवस्थेतील उडीद पिकाची काढणी करून शेड मध्ये सुकू द्यावे व व स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन मळणी करून घ्यावी. |
| कपाशी | • मध्यम श्रेणीचा पावसाचा अंदाज लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी),कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामे तसेच उभ्या पिकात खते देण्याची कामे पुढील १ ते २ दिवसामध्ये उरकून घ्यावी तसेच त्यानंतर पावसाची उघडीप होईपर्यंत पुढे ढकलावी. • मागील आठवड्यामध्ये झालेल्या पावसामुळे पिक क्षेत्रामध्ये पाणी साचले असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा तसेच पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता पिक क्षेत्रामध्ये पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. • कपाशी मध्ये फुलोरा अवस्थेत २ टक्के युरिया ची आणि बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेत २ टक्के डीएपी ची फवारणी करावी. • कपाशीमधील नैसर्गिक पाते व फुलगळ टाळण्यासाठी एनएए ४.५ एसएल ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशीमधील अतिरिक्त कायिक वाढीस प्रतिबंध करण्यासाठी मेपीक्वेट क्लोराईड १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. |
| कपाशी | • कपाशी पिकामध्ये फुलकिडे किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास थायमीथोक्झाम २५ % डब्ल्यूजी २ ग्राम प्रती १० लिटर पाणी (१००ग्राम प्रती हेक्टर) किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ८.४ मिली प्रती १० लिटर पाणी (४२० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. • ज्या ठिकाणी कपाशीचे पिक ६० ते ९० दिवसांचे आहे अशा ठिकाणी तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास, फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी @ ४ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२०० ग्राम प्रती हेक्टर)किंवा डिनोटेफुरान २० एसजी ३ ग्राम प्रती १० लिटर पाणी (१५० ग्राम प्रती हेक्टर) किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल ३ मिली प्रती १० लिटर पाणी (१५० मिली प्रती हेक्टर) या पैकी कोणत्याही एका किटकनाशकाची फवारणी सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. • पांढऱ्या माशीचा पिल्ले अवस्थेतील प्रादुर्भाव आढळून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास पायरीप्रॉक्सीफेन १० ईसी २० मिली प्रती १० लिटर पाणी (१००० मिली प्रती हेक्टर) किंवाबुप्रोफेझिन २५ एससी २० मिली प्रती १० लिटर पाणी (१००० मिली प्रती हेक्टर) किंवास्पायरोमेसिफेन २२.९ एससी १२ मिली प्रती १० लिटर पाणी (६०० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात स्वच्छ व शांत हवामान असताना फवारणी करावी. • पांढऱ्या माशीचा पतंग अवस्थेतील प्रादुर्भाव आढळून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास डायफेन्थियुरॉन ५० % डब्ल्यूपी १२ ग्राम प्रती १० लिटर पाणी (६०० ग्राम प्रती हेक्टर) किंवा ऍफिडोपायरोपेन ५० g/L २० मिली प्रती १० लिटर पाणी (१००० मिली प्रती हेक्टर) किंवा डायनोटेफुरान २० एसजी ३ ग्राम प्रती १० लिटर पाणी (१५० ग्राम प्रती हेक्टर) किंवा फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी ४ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२०० ग्राम प्रती हेक्टर) किंवा क्लोथीआनिडीन ५० डब्ल्यूडीजी १ मिली प्रती १० लिटर पाणी (५० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात स्वच्छ व शांत हवामान असताना फवारणी सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. |
| कपाशी | • गुलाबी बोंड अळीच्या निरीक्षणासाठी पेरणीनंतर ४५ दिवसांनी कामगंध सापळ्याचा वापर करावा. पतंगांच्या निरीक्षणासाठी प्रती हेक्टर ५ कामगंध सापळे उभारावे. • फुलांमध्ये गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भाव निरीक्षणासाठी पाते आणि फुले लागण्याच्या अवस्थेत निरीक्षण करावे. प्रादुर्भाव ग्रस्त डोमकळ्या काढून शेताबाहेर नष्ट कराव्या. • कपाशीचे पिक ६० दिवसांपेक्षा कमी असलेल्या ठिकाणी, ५ % निंबोळी अर्क + ५ मिली निम तेल प्रती लिटर पाणी, किंवा कडुनिंब तेलावर आधारित फॉर्म्युलेशन ५ मिली प्रती लिटर (३००किंवा १५०० पीपीएम) + 1.0 ग्राम धुण्याचा सोडा (प्रारंभिक १ ते २ फवारण्या) फवारणी करावी. निंबोळी अर्क २५ लिटर + निम तेल २.५ लिटर + ०.५ किली धुण्याचा सोडा यांचे मिश्रण प्रती हेक्टर या प्रमाणात वापरावे. फवारणी साठी प्रती एकर १५० ते २०० लिटर पाणी किंवा ३७५ ते ५०० लिटर पाणी प्रती हेक्टर या प्रमाणात वापरावे. • कपाशी मध्ये बोंडे लागण्याच्या अवस्थेत गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव व नुकसानीचे निरीक्षण करण्यासाठी यादृच्छिक पद्धतीने प्रती झाड एक बोंड या प्रमाणे २० बोंडे तोडून त्याचे निरीक्षण करावे. गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी [१० टक्के पेक्षा |

| पिक | पिक निहाय सल्ला |
| --- | --- |
| | जास्त प्रादुर्भाव ग्रस्त डोमकळ्या किंवा १० टक्के पेक्षा जास्त प्रादुर्भाव ग्रस्त बोंडे] (२० बोंडापैकी किमान २ बोंडामध्ये पांढरी किंवा गुलाबी अळी किंवा अळी बाहेर पडण्याचे छिद्र असल्यास) गाठत असल्यास किंवा सतत ३ दिवसामध्ये ८ पतंग प्रती कामगंध सापळ्यामध्ये आढळून आल्यास प्रोफेनोफोस ५० ईसी३० मिलीप्रती १० लिटर पाणी (१५०० मिली प्रती हेक्टर) किंवा ईमॅमेक्टिन बेंझोएट ५ एसजी ५ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२५० ग्राम प्रती हेक्टर) किंवाइंडोक्साकार्ब १४.५ एससी १० मिली प्रती १० लिटर पाणी (५०० मिली प्रती हेक्टर) किंवाक्लोरपायरीफॉस २० % ईसी २५ मिली प्रती १० लिटर पाणी (१२५० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात मिसळून फवारणी सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. |
| सोयाबीन | • मध्यम श्रेणीचा पावसाचा अंदाज लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी),कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामे तसेच उभ्या पिकात खते देण्याची कामे पुढील १ ते २ दिवसामध्ये उरकून घ्यावी तसेच त्यानंतर पावसाची उघडीप होईपर्यंत पुढे ढकलावी. • मागील आठवड्यामध्ये झालेल्या पावसामुळे पिक क्षेत्रामध्ये पाणी साचले असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा तसेच पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता पिक क्षेत्रामध्ये पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. • सोयाबीन च्या शेंगा भरण्याच्या अवस्थेत २ टक्के युरियाची (२०० ग्राम युरिया + १० लिटर पाणी) फवारणी करावी. • शेतकरी बांधवांनी सोयाबीन पिकामध्ये नियमित अंतराने शेताच्या ३ ते ४ ठिकाणी कीड/अळी चा प्रादुर्भाव तसेच त्यांच्या अवस्था या बाबतीत निरीक्षण करावे. यामुळे कीड नियंत्रणाचे उपाय राबविण्यासाठी मदत होईल. • शेतकरी बांधवांनी अळ्या खाणाऱ्या शिकारी पक्ष्यांना थांबण्यासाठी सोयाबीन शेतात विविध ठिकाणी ‘ T ’ आकाराचे पक्षीथांबे उभारावेत. • सोयाबीन पिकामध्ये उंटअळी, तंबाखूची पाने खाणारी अळी व शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी ब्रोफ्लानिलाइड ३०० g/l एससी (४२ ते ६२ ग्राम प्रती हेक्टर) किंवा फ्लुबेन्डियामाइड ३९.३५ % w/w एससी (१५० मिली प्रती हेक्टर) किंवा इंडोक्साकार्ब १५.८० %ईसी (३३३ मिली प्रती हेक्टर)किंवा टेट्रानिलीप्रोल 18.18 एससी (२५० ते ३०० मिली प्रती हेक्टर) किंवा नोव्हॅल्युरॉन ०५.२५ % + इंडॉक्साकार्ब ०४.५० % एससी (८२५ ते ८७५ मिली प्रती हेक्टर)किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५ % एससी (१५० मिली प्रती हेक्टर) किंवा ईमामेक्टिन बेंझोएट ०१.९० % ईसी (४२५ मिली/हेक्टर) किंवा फ्लुबेन्डियामाइड २० %डब्ल्यूजी (२५० ते ३०० ग्राम प्रती हेक्टर) किंवा लॅम्बडा- सायहॅलोथ्रीन ०४.९० %सीएस (३०० मिली/हेक्टर) किंवा प्रोफेनोफोस ५० %ईसी (१ लिटर प्रती हेक्टर) किंवा स्पिनेटोरम ११.७० % एससी (४५० मिली प्रती हेक्टर) किंवा पूर्व-मिश्रित किटक नाशक बीटा-सायफ्लुथ्रिन ०८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % w/w ओडी (३५० मिली प्रती हेक्टर) किंवा थायामेथोक्सम १२.६० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०९.५०% झेडसी (१२५ मिली/हेक्टर) किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी (२०० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात वरीलपैकी कोणत्याही एक कीटकनाशकाची सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. |
| सोयाबीन | • सोयाबीन पिकामध्ये खोडमाशी किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % झेडसी १२५ मिली प्रती ५०० लिटर पाणी प्रती हेक्टर या प्रमाणात स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. • सोयाबीन पिकामध्ये चक्रीभुंगा व पाने खाणाऱ्या अळ्यांच्या एकत्रित व्यवस्थापनासाठी क्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी (२०० मिली मिली/हेक्टर) किंवा थायमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % झेडसी १२५ मिली प्रती हेक्टर किंवा बीटा- सायफ्ल्यूथ्रीन ८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % ओडी ३५० मिली प्रती हेक्टर या प्रमाणात सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. • सोयाबीन पिकामध्ये पिवळा मोझेक विषाणू या रोगाचा प्रसार करण्यास कारणीभूत असलेल्या पांढऱ्या माशी या किडीच्या प्रतिबंधात्मक व्यवस्थापनासाठी शेतामध्ये ठीक ठिकाणी पिवळे चिकट सापळे लावावेत. • सोयाबीन पिकामध्ये पिवळ्या मोझेक या रोगाच्या व्यवस्थापनासाठी शेतातील प्रादुर्भाव ग्रस्त झाडे उपटून नष्ट करावी तसेच पूर्व मिश्रित कीटकनाशक, थायमेथोक्झाम १२.६ % + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % झेडसी १२५ मिली प्रती हेक्टर किंवा बीटा- सायफ्ल्यूथ्रीन ८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % ओडी ३५० मिली प्रती हेक्टर ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना सध्याच्या पावसाच्या उघाडीनंतर स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. या फवारणी द्वारे खोड माशी या किडीचे सुद्धा नियंत्रण होते, पिवळा मोझेक या विषाणू जन्य रोगाच्या प्रसारास कारणीभूत पांढरी माशी या किडीला आकर्षित करण्यासाठी ठीक ठिकाणी पिवळे चिकट सापळे लावावेत. |
| भात | • मध्यम श्रेणीचा पावसाचा अंदाज लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे (खुरपणी/डवरणी),कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामे तसेच उभ्या पिकात खते देण्याची कामे पुढील १ ते २ दिवसामध्ये उरकून घ्यावी तसेच त्यानंतर पावसाची उघडीप होईपर्यंत पुढे ढकलावी. • जमिनीची तपासणी करुन योग्य प्रमाणात रासायनिक खताचा वापर केल्यास शेती किफायतशीर होते. सर्वसाधारणपणे १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. संपूर्ण स्फुरद व पालाश आणि नत्राची अर्धी मात्रा चिखलावर तर उरलेली नत्राची अर्धी मात्रा दोन समान हप्त्यात (फुटवे फुटण्याच्या वेळी साधारणपणे ३० दिवसांनी आणि लोंबी येण्याच्या सुरुवातीस साधारणपणे ६० दिवसांनी) |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | विभागून द्यावी. • खोडकिडीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी २० या प्रमाणे कामगंध सापळे लावावे. ट्रायकोग्रामा जापोनिकम (ट्रायकोकार्ड) हे परोपजीवी किटक हेक्टरी ५०,००० अंडी या प्रमाणात दर ७ दिवसाच्या अंतराने ३ ते ४ वेळा सोडावे. शेतात १० % किडग्रस्त फुटवे दिसताच क्लोरॅनट्रानीलीप्रोल ०.४ % दाणेदार @ १० कि.ग्रॅ. किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड ४ जी @ १८ कि.ग्रॅ. किंवा फीप्रोनिल ०.३ जी @ २५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर बांधीमध्ये पाणी असतांना टाकावे किंवा क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ % एस.सी. @ ३ मिली. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • गादमाशी:- कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार @ २५ किलो ग्रॅम प्रती हेक्टरी बांधीमध्ये ७ ते १० सेमी. पाणी, असतांना वापरावे. बांधीमधील पाणी ४ ते ५ दिवस बांधीबाहेर काढू नये. • करपा:- हेक्झाकोनॅझोल ५ % ई.सी. @ २० मि.ली. किंवा मेंकोझेब ७५% प्रवाही @ ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कडाकरपा:- कॉपर हैड्रॉकसाईड ५३.८ % टक्के डी एफ @ ३० ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन @ १.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • धान लावणीनंतर रोपाची मुळे चांगली रुजेपर्यंत बांधीत पाण्याची पातळी २.५ से.मी. (एक इंच) ठेवावी. यानंतर दाणा पक्व होईपर्यंत ही पातळी साधारणतः ५ सें.मी. (दोन इंच) पर्यंत वाढवावी. |
| मोसबी | • फळांवरची फॉयटॉफ्थोराची तपकिरी कूज साठी फॉसेटिल ए. ल २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात (ऑगस्ट आणिसप्टेंबरमध्ये दोनदा ४० दिवसांच्या अंतराने) पानांवार फवारणी करावी. • फळ माशीच्या नियंत्रणासाठी हेक्टरी २०-२५ मिथाइल युजेनॉलचे काम गंध सापळे लावणे. प्रत्येक १५-२०दिवसांच्या अंतराने आमिष (मिथाइल युजेनॉल) बदलावे. • फळांच्या परिपक्वतेच्या अवस्थेत फळांचा रंग बदलाच्या वेळी फळ रस शोषण करणाऱ्या पतंगाच्याव्यवस्थापनासाठी कडूलिंबाचे तेल १० मि. लि./लिटर किंवा पेट्रोलियम फवारणी तेल (खनिज तेल) २० मि.लि./लिटर १०-१५ दिवसांच्या अंतराने, फळांची तोडणी होईपर्यंत करावी. • बगीच्यात झाडाखाली पडलेली फळे एकत्र करून कंपोस्ट खड्ड्यात पुरून टाकावीत. • आंबिया बहरातील फळांचा फळांचा आकार वाढवण्यासाठी १.५ किलो मोनोपोटाशिअम फॉस्फेट/युरिया/ पोटॅशियम नायट्रेट/डायमोनियम फॉस्फेट आणि जिबर्लिक ऍसिड ($GA^3$) १.५ ग्रॅम १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • अंबिया बहारामध्ये फळ गळटाळण्यासाठी १००. लिटर पाण्यात कार्बेन्डाझिम १०० ग्रॅम आणि $GA^3$ किंवा 2,4-डी किंवा नॅफ्थालीन एसिटीक ऍसिड (NAA) १.५ ग्रॅम १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| पपई | • पपईची ६ आठवड्यांची रोपे २.५ x २.५ मीटर अंतरावर लावावी. |
| वांगे | • मागील आठवड्यातील पाऊस, उच्च आर्द्रता आणि ढगाळ हवामानामुळे, वांग्याच्या पिकावर फळे व शेंडा पोखरणाऱ्या अळीचा रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यासकार्बोसल्फान २५ % ईसी १२५० मिली प्रति हेक्टर किंवाडेल्टामेथ्रिन ०२.८० % ईसी ४०० ते ५०० मिली प्रति हेक्टर किंवाइमामेक्टिन बेंझोएट ०५ % एसजी २०० ग्रॅम प्रति हेक्टर किंवालॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.९० % सीएस ३०० मिली प्रति हेक्टर किंवास्पिनोसॅड ४५ % एससी १६२ ते १८७ मिली प्रति हेक्टर किंवाथियाक्लोप्रिड २१.७० % एससी ७५० मिली प्रति हेक्टर किंवाक्लोरॉंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी २०० मिली प्रति हेक्टर या प्रमाणात ५०० लिटर पाण्यात मिसळून कोणत्याहीएका कीटकनाशकाची फवारणी करावी, |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. • बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. • जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. • नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |
| गाय | • लम्पि त्वचा रोग: लक्षणे आणि प्रतिबंधक उपाय: • रोगाची लक्षणे: गाई, म्हशी, बैलांच्या डोक्यावर, मानेवर, पायावर,पोळावर जननेंद्रियाभोवती आणि संपूर्ण शरीरावरच गाठी दिसतात. गाठीच्या मध्यभागी खपल्या पकडतात, कालांतराने त्या पडतात आणि तिथे व्रण पडतात. पायावर, पोळावर आणि |

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
| --- | --- |
| | जननेंद्रियावर सूज येऊ शकते. जनावर चारा खाणे बंद करते आणि चालूही शकत नाही. नाकातून आणि डोळ्यातून स्त्राव वाहतो. दूध उत्पादनात घट येते. गाभण जनावरात गर्भपात होऊ शकतो. • प्रतिबंधक उपाय: गाई, म्हशी आणि बैलांचा गोठा हवेशीर आणि स्वच्छ ठेवावा. गाई, म्हशी आणि बैलांची खरेदी विक्री बंद करावी. जनावरांना सकस आणि पौष्टिक आहार द्यावा. गोठ्याचे नियमित निर्जंतुकीकरण करण्याकरिता फॉरमॅलिन, फिनाईल, सोडियम हायपोक्लोराईड, इत्यादी चा वापर करावा. गोठ्यातील आणि जनावरांतील बाह्यपरजीवी कीटकांचा (उदा. माशा, डास, गोचीड, पिसवा इत्यादी) बंदोबस्त करण्याकरिता सायपरमेथ्रीन, डेल्टामेथ्रीन यासारख्या सुरक्षित पायरेथ्रॉईड घटकांचा समावेश असलेल्या औषधीयुक्त पाण्याने गोठ्याची आणि जनावरांची फवारणी नियमितपणे करावी. रोज कडुनिंबाचा पाला जाळून गोठ्यात धूर केल्यास माशा, डास यासारख्या बाह्यपरजीवी कीटकांचा प्रादुर्भाव टाळता येतो. आजारी जनावराला त्वरित बाजूला करून विलगीकरणात ठेवावे आणि उपचाराकरिता पशुवैद्यकाची मदत घ्यावी. स्वस्थ जनावरांना गोट पॉक्स हि लस टोचून घ्यावी. • उपचार: या रोगावर विशिष्ट असा उपचार नाही. लक्षणे बघून अँटी इंफ्लेमेटरी, अँटी पायरेटिक,अँटी हिस्टॅमिनिक औषधांचा वापर करावा लागतो. भूक आणि प्रतिकारशक्ती वाढविण्याकरिता खनिज आणि जीवनसत्वयुक्त औषधे द्यावी लागतात. दुय्यम संसर्ग टाळण्याकरिता प्रतिजैविकांचा वापर सुद्धा करावा लागू शकतो. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
| --- | --- |
| पक्षी | • पक्षांना सकस आहार तसेच स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
| --- | --- |
| सामान्य सल्ला | • पालक, मेथी, मुळा, गाजर, वाल, तोंडली या भाजीपाला पिकाची लागवड करावी. |
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. * संशोधनावर आधारित शिफारस. दोन किंवा त्यापेक्षा अधिक रसायने किंवा संजीवके एकत्र मिसळू नये. |